महा
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

चौथा मजला ,प्रकाशगड अनंत कानेकर मार्ग स्टेशन रोड बांद्रा (पू) मुंबई ४००० ०५१
दू : २६४२२२२१ / २६४७२१३१ Tlx.:०११- ७८२९३/९४ MSEB IN फॅक्स : ०२२ -२६४७६७४९ तार : MUMBAIGRID Mumbai
E-mail: gmntestt@mahadiscom.in website: www.mahadiscom.in

**साप्रवि/वेतन व देयके/सण अग्रिम/११९/३१५४४** **दिनांक :- ०८.११.२०१२.**

# परिपत्रक

**विषय :-** महत्वाच्या सणासाठी अग्रिम देण्याबाबत.

सर्व सामान्य आदेश क्रं.२६७ दि. १२.१०.१९५७ अन्वये म.रा.वि.वि.कंपनीतील कर्मचाऱ्यांना शासकीय नियमानुसार महत्वाच्या सणांसाठी अग्रिम रक्कम देण्यात येते.

या कार्यालयाचे परिपत्रक क्रं.साप्रवि/वेतन व देयके/सण अग्रिम/११९/२६०६७ दि.२५.०८.२०११ अन्वये, ज्या कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन रु.१४,०७५/- पेक्षा अधिक नसेल अशा कर्मचाऱ्यांना रु. २५००/- इतकी सण अग्रिम रक्कम देय होती. तथापि, आता महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रं. अग्रिम-२०१२/प्र.क्रं.३२/१२/विनियम दि. १८ ऑक्टोबर २०१२ अन्वये सण अग्रिमासाठी मर्यादा सुधारीत करण्यात आली आहे.

प्रशासकीय परिपत्रक क्रं. १ दि. २९.०९.०५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व्यवस्थापकीय संचालक (वितरण) यांनी संचालक (संचलन), व संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन महावितरण कंपनीतील ज्या कर्मचाऱ्यांचे मुळ वेतन रु. १४०७५/- (रुपये चौदा हजार पंच्याहत्तर फक्त) पेक्षा जास्त नसेल अशा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय सण अग्रिम रु. ५०००/- देण्यास मान्यता दिली आहे.

सण अग्रिम फक्त पुढील सणांना तसेच शासनाकडून वेळोवेळी घोषित करण्यात येणाऱ्या सणांसाठी अनुज्ञेय राहील.

१) दिवाळी
२) रमझान ईद
३) ख्रिसमस
४) पारशी नववर्ष
५) संवत्सरी
६) रोश-होशना
७) वैशाखी पौर्णिमा (भगवान बुध्द जयंती)
८) स्वातंत्र्य दिन
९) प्रजासत्ताक दिन

सदरहू परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापासून आमलात येईल.

सण अग्रिम मंजूर करण्यासंबंधिच्या इतर अटी व शर्ती पूर्वी विहित केल्याप्रमाणे राहतील.

**सदर परिपत्रक कंपनीच्या इंन्ट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.**

**(सु.मा. कालेवाड)**
**महाव्यवस्थापक (मासं-आस्था)**

**प्रति,**
महावितरण कंपनीतील प्रेषण यादीप्रमाणे.

D:New folder/Salary & Claims/Marathi.docx